# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.06.2024** **वारःगुरुवार**

---

1. रालोआच्या बैठकीत नेतेपदी नरेंद्र मोदी यांची निवड
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा, 17 वी लोकसभा विसर्जित
3. पुढील हालचालींबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीत मंथन
4. राज्यातल्या पराभवाची जबाबदारी स्वतःकडे घेत उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची देवेंद्र फडणवीस यांची विनंती आणि
5. राज्यात मोसमी पाऊस लवकरच दाखल होणार.

**<u>मोदी निवड</u>**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापनेची रणनीती ठरवण्याकरता भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी-रालोआ च्या घटक पक्षांची काल नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीत रालोआच्या नेतेपदी नरेंद्र मोदी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर संसदीय नेत्याची निवड 7 जून रोजी होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, लोक जनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान, तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार बैठकीला उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत भाजपप्रणित रालोआ ला 293 जागा मिळाल्या, तर इंडी आघाडीला 234 जागांवर समाधान मानावं लागलं.

**<u>मोदी राजीनामा</u>**

या बैठकीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पंतप्रधान पदाबरोबरच केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा सुपूर्त केला. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी 17 वी लोकसभा प्रथेनुसार विसर्जित केली आणि 18 वी लोकसभा आणि नवं सरकार स्थापन होईपर्यंत पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रीमंडळाला पदावर राहण्याची विनंती केली. 17 व्या लोकसभेचा कार्यकाळ 16 जून रोजी संपत आहे. दरम्यान, नव्या सरकार स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी उद्या 7 जून रोजी राष्ट्रीय लोकशाही आघाडीची दिल्लीत बैठक होणार आहे.

**<u>इंडि बैठक</u>**

इंडिया आघाडीच्या बैठकीत काल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी पुढील रणनितीबाबत मंथन करण्यात आलं. तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी, यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते. बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की युती भागीदारांनी देशातील वर्तमान राजकीय परिस्थितीवर चर्चा केली.

**फडणवीस**

लोकसभा निवडणुकीत झालेल्या राज्यातल्या पराभवाची जबाबदारी स्वतः घेऊन पक्षात पूर्णवेळ काम करण्यासाठी उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती आपण केंद्रीय नेतृत्वाकडं करणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणूकीच्या राज्यातल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर ते काल मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

सत्तेत आल्यानंतर भाजपा संविधान बदलेल असा प्रचार विरोधकांनी केला; आणि या प्रचाराला प्रत्युत्तर देण्यात आपण कमी पडलो. शेतकऱ्यांचे प्रश्न, मराठा आरक्षण, अल्पसंख्याक समुदायात असुरक्षिततेची भावना या गोष्टीही आपल्या पराभवाला कारण ठरल्या; असं फडणवीस यावेळी म्हणाले. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधून बाहेर पडून काम करण्याची गरज नसून सरकारमध्ये राहूनच मदत करावी, अशी विनंती आपण फडणवीस आणि केंद्रीय नेतृत्वालाही करणार असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**मुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'निवडणुकीतील पराभव ही सामूहिक जबाबदारी असल्याची' प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही तिन्ही पक्षांनी निवडणुकीत एकत्र काम केलं होतं; मतांची टक्केवारी पाहिली तर मुंबईत महायुतीला दोन लाखांहून अधिक मतं मिळाली आहेत असं सांगून मूळ मतदार महायुतीबरोबर असल्याचं दिसून आलं आहे. विरोधकांच्या अपप्रचारामुळे जनतेचा संभ्रम दूर कमी करण्यात आम्ही कमी पडलो. पराभवाची कारणमिमांसा केली जाईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

**विधानपरिषद**

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघासाठी काँग्रेसकडून रमेश कीर यांना उमेदवारी देण्यात आल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. तसंच मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी शिवसेनेचे दीपक सावंत यांनी काल उमेदवारी अर्ज भरला. मुंबई शिक्षक मतदार संघासाठी शिक्षक परिषदेचे उमेदवार शिवनाथ दराडे यांना भाजपानं पाठिंबा दिल्याची घोषणा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

**राज्यसभा**

राज्यसभेचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी पोट-निवडणुकीची घोषणा करण्यात आली असून 13 जूनपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. अर्जांची छाननी 14 जून रोजी होईल. अर्ज मागं घेण्याची शेवटची तारीख 18 जून असून पोटनिवडणुकीसाठीचं मतदान 25 जून रोजी होईल, असं महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कळवलं आहे.

**आयआयटी**

मुंबई आय आय टी यंदा 'क्वाक्वेरेली सायमंड्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी' च्या जागतिक विद्यापीठ क्रमवारीमध्ये स्थान मिळवणारी पहिली भारतीय संस्था ठरली आहे. मुंबई आय आय टी ने 100 पैकी 56.3 गुण मिळवत पहिल्या 125 पैकी 118 वं स्थान मिळवलं आहे. गेल्या वर्षी आय आय टी 149व्या क्रमांकावर होती. विविध निकषांपैकी नोकरी देणाऱ्या संस्थांनी सर्वोच्च पसंतीचा दर्जा दिल्यामुळं याबाबतीत मुंबई आय आय टी जागतिक स्तरावर 63 व्या क्रमांकावर आहे.

संस्थेचे संचालक प्राध्यापक शिरीष केदारे यांनी या यशाचं श्रेय प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांना दिलं आहे.

**वृक्ष-धुळे**

जागतिक पर्यावरण दिनाचं औचित्य साधून राज्यभर काल विविध ठिकाणी वृक्षारोपण आणि कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. धुळे महानगरपालिकेच्या वतीनं 5 वर्षापूर्वी लावण्यात आलेल्या झाडांचा 'वृक्ष-वाढदिवस' साजरा करण्यात आला. धुळे शहर आणि परिसरात 5 लाख वृक्ष लावण्याचा संकल्प केला असून त्याकरता महापालिकेनं कृती आराखडा तयार केला आहे असं महापालिकेचे प्रशासक, आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी सांगितलं.

**आरोग्य शिबिर**

प्रत्येक व्यक्तीसाठी 'माझे आरोग्य, माझी जबाबदारी' हा संकल्प अत्यंत महत्वपूर्ण आहे असं महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांनी म्हटलं आहे. विद्यापीठ आणि नाशिकचं नामको रुग्णालय, यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचं उद्घाटन करण्यात आलं त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. देशात मधुमेह, रक्तदाब आणि ॲनिमिया रोगांचं प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असून यासाठी प्रतिबंध आणि वेळोवेळी तपासण्या करणे गरजेचं आहे असं त्यांनी सांगितलं. पुण्याच्या चेल्लाराम फाऊंडेशन समवेत मधुमेहासंदर्भात आयुर्वेदिक औषधे आणि आयुर्वेदिक जीवनशैलीचा अभ्यास करण्यासाठी एक संशोधन प्रकल्प हाती घेतल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**क्रिकेट**

आयसीसी टी-20 विश्व करंडक स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यात भारतानं आयर्लंडचा 8 गडी राखून पराभव केला. न्यूयॉर्कमध्ये काल रात्री झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडचा संघ 16 षटकांत 96 धावा करु शकला. हार्दिक पंड्यानं तीन तर जसप्रीत बुमराहनं दोन गडी बाद केले. भारतानं तेराव्या षटकात दोन गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केलं. कर्णधार रोहित शर्मानं 52 तर रिषभ पंतनं 36 धावा केल्या. यानंतर भारताचा सामना पाकिस्तानसोबत 9 तारखेला तर सह-आयोजक अमेरिकेसोबत 12 तारखेला होणार आहे.

**फ्रेंच**

द्वितीय मानांकित रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन या जोडीचा फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील उपांत्य फेरीचा सामना आज होणार आहे. यामुळे रोलँ गॅरो इथं पुरुषांच्या उपांत्य फेरीत रोहननं दुसऱ्यांदा प्रवेश केला आहे. यापूर्वी रोहननं कॅनडाच्या गॅब्रिएलाच्या साथीनं 2017 मध्ये या स्पर्धेतील मिश्र दुहेरीचं अजिंक्यपद मिळवलं होतं.

**पाऊस**

राज्यात काल अनेक ठिकाणी पाऊस झाला. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात काल पाऊस झाला. कोल्हापूर जिल्ह्यात काल दुपारी पावसानं दमदार हजेरी लावली. नांदेड जिल्ह्यात देगलूर इथेही काल वीजांसह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळं शेतकरी खरीप पेरणीच्या तयारीसाठी लागले आहेत. धुळे शहरात मुसळधार पाऊस झाल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. सांगली जिल्ह्यातील वाळवा आणि पलूस तालुक्यात काल दुपारी वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे तापमानात कमालीची घट होत काल 36 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. पावसाने काल संध्याकाळी पुन्हा जोर धरला होता. पुणे आणि परिसरात कालही संध्याकाळी मुसळधार पाऊस पडला त्यामुळं उष्णतेची लाही कमी झाली आहे.

**<u>हवामान</u>**

मोसमी पाऊस केरळपासून पुढे सरकत गोव्यात पोहोचला असून लवकरच तो महाराष्ट्रात दाखल होईल. येत्या 2-3 दिवसांमध्ये राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे अशी माहिती जेष्ठ हवामान शास्त्रज्ञ डॉक्टर अनुपम कश्यपी यांनी दिली आहे. कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील 4-5 दिवस तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात पुणे, नगर, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा इथंही वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.